# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क्र.रासेयो/८२०/२०१५—१६
दिनांक :— १०/११/२०१५.

प्रति,
प्राचार्य,
..............................................,
..............................................,

मा. महोदय / महोदया,

या वर्षी ठाणे जिल्हयामध्ये सरासरीपेक्षा कमी पर्जन्य झाल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये पाण्याची कमतरता भासणार आहे, म्हणून मा. जिल्हाधीकारी यांच्या सुचने प्रमाणे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनराई बंधारे बांधणे ठाणे जिल्हयामध्ये सुरू करण्यात आले आहे. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. ठाणे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने या कार्यामध्ये सहकार्य करण्याची विंनती केली आहे. ठाणे जिल्हा हा मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे जिल्हयातील शहरी विभागांना पाणी पुरवठा करतो.

वरील संदर्भानुसार मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जि. प. ठाणे यांच्या कार्यालयात दिनांक ०९.११.२०१५ रोजी सकाळी ११ वा. जिल्हा व विभागीय समन्वयक, रासेयो यांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये वाहते पाणी अडवण्यासाठी व त्याचा येणाऱ्या काळामधे उपयोग करून घेण्यासाठी दि. २१, २२ नोव्हेंबर व २८, २९ नोव्हेंबर या दिवशी मुंबई, ठाणे जिल्यातील महाविद्यालयांनी वनराई बंधारे बांधण्याकरता मदत करावी असे ठरविण्यात आले.

उपरोक्त संदर्भानुसार पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेता आपल्या महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना एककास विंनती करण्यात येते की, ४० स्वयंसेवक व एक कार्यक्रम अधिकारी यांना दिनांक २१, २२ नोव्हेंबर २०१५ किंवा २८, २९ नोव्हेंबर, २०१५ या दोन दिवसीय जलव्यवस्थापन शिबिरासाठी पाठविण्यात यावे. या शिबिराची ठिकाणे दिनांक १६ नोव्हेबर २०१५ रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय बैठकीत ठरविण्यात येतील. शिबिरासाठी निवास व भोजनाची व्यवस्था उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद ठाणे यांच्या तर्फे करण्यात येईल.

राष्ट्रीय सेवा योजना नेहमीच राष्ट्रीय आपत्तीमध्ये सहकार्य करीत असते यावेळी देखील पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात घेता वरील उपक्रमास आपला सक्रीय सहभाग अपेक्षित आहे.

आपला विश्वासू,

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रासेयो विभाग